

# २. मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती
# (Post- Matric Scholarship)

**इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग यासाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजने अंतर्गत खलीलप्रमाणे ९ योजना रबिवण्यात येतात.**

## १. विजाभज विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (राज्य प्रायोजित)

**पात्रता–**

१. विद्यार्थी हा विजाभज प्रवर्गाचा असावा
२. पालक/पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. १.५० लाख पेक्षा कमी किवा समान असावे
३. उत्पन्नाचा दाखला व जातीचे प्रमाणपत्र,
४. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र
५. शैक्षणिक पात्रता इ.१० वी पास व पुढील शिक्षण चालू असावेत
६. अर्जदार फक्त व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी CAP फेरीतून आलेला असावा

**देय रककम–**

१. शिक्षण फी, परिक्षा फी, निर्वाहभत्ता आणि इतर शुल्क, या शुल्काच्या बाबी नियामक प्रधिकरणाने व तत्सम प्रधिकरणाने मंजुर केलेले दर
२. या योजनेचे लाभ १००% आहेत

**लाभाचे स्वरूप**

ट्यूशन फी, परीक्षा शुल्क, देखभाल भत्ता, इतर फी

## २. विजाभज विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क (राज्य योजना)

**पात्रता–**

१. विद्यार्थी हा विजाभज प्रवर्गाचा असावा .
२. विद्यार्थी शालांत परिक्षोत्तर शिक्षण घेणारा असावा.
३. पालक/पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.८ लाख पेक्षा कमी किंवा समान असावे
४. अर्जदार फक्त व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी CAP फेरीतून आलेला असावा

**देय रककम–**

१. शिक्षण फी, परिक्षा फी, निर्वाहभत्ता आणि इतर शुल्क, या शुल्काच्या बाबी नियामक प्रधिकरणाने व तत्सम प्रधिकरणाने मंजुर केलेले दर
२. या योजनेचे लाभ १००% आहेत

**लाभाचे स्वरूप**

ट्यूशन फी, परीक्षा शुल्क

## ३. इयत्ता १० वी च्या परिक्षेत विशेष प्राविण्य मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या तसेच इ.१२ वी मध्ये शिकणाऱ्या विजाभज / विमाप्रवर्गाच्या मुला- मुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती (राज्य योजना)

**पात्रता-**

१. विद्यार्थी हा विजाभज / विमाप्र प्रवर्गाचा असावा.
२. विद्यार्थी इयत्ता ११ वी व १२ वी कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणारा असावा.
३. सदरील शिष्यवृत्ती करिता उत्पन्नाची अट नाही.
४. विद्यार्थ्यास इयत्ता १० वी मध्ये ७५ टक्के व त्या पेक्षा जास्त गुण मिळणे आवश्यक आहे.
५. ही शिष्यवृत्ती भारत सरकार शिष्यवृत्ती व इतर गुणवत्ता शिष्यवृत्ती योजने व्यतिरिक्त असेल

**देय रककम-**

प्रतिमाह रु. ३०० प्रमाणे १० महिन्यांसाठी रु. ३,०००/- इतका लाभ देण्यात येतो .

**लाभाचे स्वरूप**

१. ११ वी आणि १२ वी मध्ये शिकणाऱ्या अर्जदारांना शिष्यवृत्ती रु. ३००/- दरमहा आणि १० महिन्यासाठी रु. ३०००/-

## ४. विमाप्र विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क (राज्य योजना)

**पात्रता-**

१. विद्यार्थी हा विमाप्र प्रवर्गाचा असावा.
२. विद्याथी शालांत परिक्षोत्तर शिक्षण घेणारा असावा.
३. शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु.१.५० लाखा पर्यंत तसेच शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क साठी पालकाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाखापर्यंत
४. अर्जदार फक्त व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी CAP फेरीतून आलेला असावा

**देय रककम-**

१. शिक्षण फी, परिक्षा फी, निर्वाहभत्ता आणि इतर शुल्क, या शुल्काच्या बाबी नियामक प्राधिकरणाने व तत्सम प्रधिकरणाने मंजुर केलेले दर
२. या योजनेचे लाभ १००% आहेत

**लाभाचे स्वरूप**

ट्यूशन फी, परीक्षा शुल्क, देखभाल भता, इतर फी

## ५. व्यावसायिक पाठयक्रमाशी संलग्न असणाऱ्या वसतिगृहातील निवासी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता प्रदान करणे (विजाभज/विमाप्र) (राज्य योजना)

**पात्रता-**

१. विद्यार्थी हा विजाभज व विमाप्र प्रवर्गातील असावा.
२. विद्यार्थी हा वैद्यकीय, अभियांत्रिकी, पशुधन या अभ्यासक्रमांचा पदवी/पदव्युत्तर शिक्षण नियमित घेणारा असावा.
३. विद्यार्थी हा भारत सरकार शिष्यवृत्ती धारक असावा अथवा आणि त्याने शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज केलेला असावा.
४. अर्जदार पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. १ लाख पेक्षा कमी किंवा समान असावे.
५. अर्जदाराने व्यावसायिक महाविद्यालयांशी संलग्न असलेल्या वसतिगृहांमध्ये प्रवेश घेतलेला असावा किंवा खोल्या उपलब्ध नसल्याचा दाखला सादर केले

**देय रककम–**

| अभ्यासक्रमाचा प्रकार आणि कालावधी | वसतिगृहामध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विद्यावेतन (१० महिन्यासाठी) | वसतिगृहाबाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विद्यावेतन (१० महिन्यासाठी) |
|---|---|---|
| ४ ते ५ वर्षाचे वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, पशुवैद्यकीय, वास्तुशास्त्र, इ. अभ्यासक्रम. | ७०००/– | १००००/– |
| २ ते ३ वर्षाचे अभियांत्रिकी, पदविका, पदवी, एमबीए, एमएसडब्ल्यू इ. | ५०००/– | ७०००/– |
| २ वर्ष किंवा त्यापेक्षा कमी कालावधीचे अभ्यासक्रम. उदा: बीएड डीएड इ. | ५०००/– | ५०००/– |

**लाभाचे स्वरूप**

१. रु. ५०० ते रु. १० महिन्यांसाठी ७०० प्रति महिना. देय रक्कम अभ्यासक्रमाच्या प्रकारावर अवलंबून असते

## ६. इमाव विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (केंद्र योजना) नवीन योजना – ओबीसी, ईबीसी व डीएनटी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती – (केंद्र व राज्य) (६0:४0)

**पात्रता–**

१. पालक/पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. १.५० लाख पेक्षा कमी किंवा समान असावे.
२. उत्पन्नाचा दाखला व जातीचे प्रमाणपत्र,
३. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र.
४. शैक्षणिक पात्रता इ.१० वी पास व पुढील शिक्षण चालु असावे.
५. अर्जदार फक्त व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी CAP फेरीतून आलेला असावा.

**देय रककम–**

१. शिक्षण फी, परिक्षा फी, निर्वाहभत्ता आणि इतर शुल्क, या शुल्काच्या बाबी नियामक प्रधिकरणाने व तत्सम प्रधिकरणाने मंजुर केलेले दर

२. शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांना (डीएड व बीएड अभ्यासक्रम वगळून) ५०% शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क दिले जाते.

**लाभाचे स्वरूप**

ट्यूशन फी, परीक्षा शुल्क, देखभाल भत्ता, इतर फी

## ७. इमाव विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (राज्य योजना)

**पात्रता–**

१. पालक/पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. १.५० लाख पेक्षा कमी किंवा समान असावे.
२. उत्पन्नाचा दाखला व जातीचे प्रमाणपत्र,
३. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र.
४. शैक्षणिक पात्रता इ.१० वी पास व पुढील शिक्षण चालु असावेत.
५. अर्जदार फक्त व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी CAP फेरीतून आलेला असावा.

**देय रककम–**

१. शिक्षण फी, परिक्षा फी, निर्वाहभत्ता आणि इतर शुल्क, या शुल्काच्या बाबी नियामक प्रधिकरणाने व तत्सम प्रधिकरणाने मंजुर केलेले दर

२. शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांना

(डीएड व बीएड अभ्यासक्रम वगळून) ५०% शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क दिले जाते.

**लाभाचे स्वरूप**

ट्यूशन फी, परीक्षा शुल्क, देखभाल भत्ता, इतर फी

## ८. इमाव विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क (राज्य योजना)

**पात्रता–**

१. पालक/पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.८ लाख पेक्षा कमी किंवा समान असावे

२. अर्जदार फक्त व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी CAP फेरीतून आलेला असावा

३. ओबीसी अर्जदारांना सरकारमध्ये प्रवेश व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये मान्यताप्राप्त नॉन–अनुदानित महाविद्यालयांना ५०% शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क दिले जाते.

**देय रककम–**

१. अनुदानित/विनाअनुदानित शासनमान्य महाविद्यालयाकरिता संबधित महाविद्यालयाचे प्राचार्य/सेवा पुरविणारे अधिकारी कर्मचारी

२. शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांना (डीएड व बीएड अभ्यासक्रम वगळून) ५०% शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क दिले जाते.

**लाभाचे स्वरूप**

ट्यूशन फी, परीक्षा शुल्क

## ९. OBC, VJNT आणि SBC प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती (राज्य योजना)

**पात्रता–**

१. सरकारी कौशल्य विकास संस्था किंवा खाजगी संस्थेमध्ये PPP योजनेद्वारे घेतलेले प्रवेश आणि केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश.

२. एकूण कौटुंबिक उत्पन्न रु.८.०० लाख पेक्षा कमी किंवा तितके असावे. नॉन क्रीमी लेयर प्रमाणपत्र आवश्यक आहे

३. DGT, नवी दिल्ली किंवा MSCVT मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतला

**देय रककम–**

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमांसाठी गठीत केलेले प्रशिक्षण शुल्क वजा जाता, उर्वरित प्रशिक्षण शुल्काच्या ८० टक्के इतक्या रकमेची प्रतिपूर्ती विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अनुज्ञेय राहील

**लाभाचे स्वरूप**

ट्यूशन फी, परीक्षा शुल्क

## सदर योजनेचा लाभ घेण्याची कार्यपद्धती

१. या सर्व योजनांचे संगणकीकरण झालेले असून https://mahadbt.maharashtra.gov.in ऑनलाईन फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे या वेबसाईटवर उपलब्ध आहे या योजनेच्या अधिक माहितीसाठी संबधित जिल्ह्याचे सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण/ सहायक आयुक्त समाज कल्याण तसेच संबधित शाळा महाविद्यालयाचे प्राचार्यांशी संपर्क साधावा.

२. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून विजाभज व विमाप्र प्रवर्गातील उमेदवारांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची योजना (मागेल त्याला प्रशिक्षण) ही राज्यस्तरीय योजना आहे. विमुक्त जाती/ भटक्या जमाती/ विशेष मागास प्रवर्गासाठी ही योजना लागू आहे.संबंधित संस्थांच्या प्राचार्यांनी पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव तयार करून संचालक, व्यवसाय

शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे अधिक माहितीकरिता संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,मुंबई,संबंधित शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था.,संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याशी संपर्क साधावा.
https://mahadbt.maharashtra.gov.in उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे

३. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिकणा-या विजाभज/विमाप्र विद्यार्थ्यांना विद्यावेतन ही राज्यस्तरीय योजना आहे. विमुक्त जाती/ भटक्या जमाती/ विशेष मागास प्रवर्ग करिता योजना आहे. संबंधित जिल्हयाचे सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण/ सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याशी अधिक माहितीकरिता संपर्क साधावा. https://mahadbt.maharashtra.gov.in उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

- **सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी संपर्क :- संबंधित जिल्ह्याचे सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग**
- **संकेतस्थळ :- https://mahadbt.maharashtra.gov.in**